# पशुधनातील लंपी स्कीन डिसीज

प्रा. के. एल जगताप
विषय विशेषज्ञ (पशु संवर्धन व दुग्धशास्त्र)

डॉ. बी. बी. गायकवाड
विषय विशेषज्ञ (किटकशास्त्र)

डॉ. अजय किनखेडकर
कार्यक्रम समन्वयक

कृषि विज्ञान केंद्र, खामगाव, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

लंपी स्कीन डिसीज हा गोवंशीय प्राण्यांचा संसर्गजन्य व विषाणूजन्य आजार आहे. महाराष्ट्रातील पशुधनास लंपी स्कीन डिसीज या संसर्ग आजाराने त्रस्त केले आहे. महाराष्ट्रातील मराठवाडा व विदर्भ या विभागामध्ये याचे प्रमाण सर्वाधिक आहे. विदर्भ आणि मराठवाड्यातील काही जिल्ह्यांमध्ये हा आजार झपाट्याने पसरत आहे आणि त्यामुळे दुग्धउत्पादक शेतकऱ्यामध्ये भीती पसरली आहे. या लंपी आजाराचे निदान एप्रिल महिन्यात सर्वप्रथम झाले. हा आजार तेलंगणा राज्य, त्याजवळील गडचिरोली तसेच सिरोंचा भागात दिसून आला. त्यानंतर या आजाराचा प्रसार मराठवाडा व विदर्भ भागात भरपूर प्रमाणात आढळतो आहे.

शेळ्यामेंढ्यामधील विषाणूजन्य देवीच्या आजाराशी साधर्म्य असणारा हा लंपी स्कीन डिसीज आजार आहे. गाय, बैल, वासरे यामध्ये होणारा विषाणूजन्य आजार आहे. या आजाराला संकरीत जनावरे ही देशी जनावरापेक्षा लवकर बळी पडतात. या आजारामुळे जनावरे अशक्त होतात तसेच दुधाळ जनावराचे दुधाचे उत्पादन घटते.

विषाणूमुळे जनावराच्या त्वचेवर ताठ, गोल, त्वचेच्या गाठी २-५ सेमी व्यासाच्या असतात, याशिवाय ताप, तोंडात घाव आणि दुधाचे उत्पादन कमी होते. महाराष्ट्रात सध्या सक्रिय असलेल्या विषाणूचा प्रादुर्भाव जवळजवळ २० टक्के विकृती आणि मृत्यूदरात सुमारे 1 टक्के पेक्षा कमी असल्याचे म्हटले जाते. राज्यात लसीकरण कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे.

## आजाराची लक्षणे:

- पहिल्याप्रथम जनावरास दोन ते तीन दिवस दिवस हलकासा ताप येतो.
- जनावराच्या शरीरावर पाठ, पोट, पाय, जननेंद्रिय या भागावर गोल व कडक आकाराच्या गाठी येतात.



- आजारग्रस्त जनावराच्या नाकातून, डोळ्यातून पातळ पदार्थ गळतो.
- तोंडात असलेल्या वृणामुळे जनावरांना खाण्यास त्रास होतो. खाण्याचे प्रमाण देखील कमी होते.
- श्वासोच्छवासास देखील त्रास होतो.
- डोळ्यामध्ये असलेल्या वृणामुळे देखील जनावराची दृष्टी कमी होते.
- पायावर असलेल्या गाठीमुळे जनावरांना व्यवस्थित चालता येत नाही. चालताना जनावर लंगडते.



## उपचार:

- हा विषाणूजन्य आजार असल्यामुळे यावर उपचार नाहीत.
- प्रतिकारशक्ती निर्माण होणारी, ताप कमी होणारी औषधी वापरावीत.
- तोंडातील वृण पोटॅशियम परमॅगनेट या द्रावणाने धुवून त्यावर बोरोग्लिसरीन मलम लावावा.
- उपचार करत असताना अथवा नमुने गोळा करत असताना पीपीई किटचा वापर करावा.
- या आजारावर लस उपलब्ध नसल्यामुळे गोठ्यात लिंबाच्या पाल्याचे धुपन करावे. त्यामुळे गोठ्यातील किटकांचे नियंत्रण होण्यास मदत होते.
- किटकांच्या नियंत्रणासाठी करंज तेल, निम तेल व साबण यांच्या मिश्रणाने गोठा फवारून घ्यावा / साफ करावा.

वरील लेख जर व्यवस्थितपणे अभ्यासलात तर आपणास या नवीन आजाराविषयी माहिती मिळण्यास मदत होईल.

(संपर्क: +९१ ९८८१५३४१४७)

★ ★ ★